Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

ISSN 2277-8721 UGC Approved Journal No 48833

# 'देशाबाहेर' - समाज दर्शन घडवणारे प्रवासवर्णन

**डॉ. पांडूरंग गावडे,**

७८७/ए१ माऊली निवास,

रामानंदनगर,कोल्हापूर

सांगली जिल्हातील खानापुर तालुक्यातील ढबळेश्वर गावात जन्मलेला आणि अनेक पिढ्या गावकुसाबाहेरच्या दाहकतेने जगत असलेल्या कुटुंबात मच्छिंद्र सकटे यांचा जन्म झाला. जातीव्यवस्थेचे वास्तव अनुभवलेल्या गावकुसाबाहेरच्या जगाचा अनुभव असलेल्या सकटे यांनी 'देशाबाहेर' हे प्रवासवर्णन लिहीले आहे. समाजशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणुन जर्मन येथे भरलेला आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात निबंध वाचक म्हणुन सहभागी होण्याचा सन्मान त्यांना मिळाला.गावकुसाबाहेर आपण व आपल्या समाजाने जे जगणे अनुभवलेले त्यापेक्षा वेगळे अनुभव या जर्मनीच्या प्रवासाच्या निमित्ताने त्यांनी अनुभवले आणि आपल्या प्रवास वर्णनाला नाव देताना एखाद्या कल्पक साहित्यिकालाही सूचनार नाही, अशा व्यापक आशय असलेल्या नावाचा त्यांनी आपल्या प्रवासवर्णनासाठी अचुक उपयोग केला .

गावकुसाबाहेर ते देशाबाहेर असा अनुभव घेतलेल्या प्रा.डॉ. मच्छिंद्र सकटे यांना या दोन्ही मध्ये असलेला फरक प्रत्येक घटना प्रसंगातुन दाखवून दयायचा आहे. आपण अस्पर्श(Untouchable) जातीचे आहोत .या एका शब्दात भारतीय समाज व्यवस्थेत जातीचे महत्व आणि ज्या जातीने 'माणुसपण' नाकारल्यामुळे जगण्याला मिळालेले संदर्भ अधोरेखित होतात. भारतातील अशा जातीव्यवस्थेला आव्हान देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढ्याने केले त्यांनी लिहीलेल्या भारतीय राज्यघटनेने माणुस म्हणुन जगण्याचा हक्क मिळाला. दलित शिकू लागला आणि आपल्या न्यायासाठी संघर्ष करु लागला त्यापैकी डॉ मच्छिंद्र सकटे यांनी स्थापन केलेल्या दलित महासंघ चळवळीचा उल्लेख करावा लागतो.

१८ जुलै ते २३ जुलै १९९४ या कालावधीत जर्मनीतील बिलेफिल्ड विद्यापिठात भरलेल्या समाजशास्त्र विषयाच्या जागतिक परिषदेत सहभागी होण्यापुर्वी आणि प्रत्यक्ष सहभाग आणि परतीचा प्रवास अशा घटना प्रसंगाचे चित्रण त्यांनी 'देशाबाहेर' या प्रवासवर्णनात केले आहे. प्रा.डॉ. मच्छिंद्र सकटे हे समाजशास्त्र विषयाचे

प्राध्यापक आहेत. प्रवासवर्णनात अनुभवलेल्या प्रसंगांना उजाळा देताना स्थल,काल, परिस्थितीचे वर्णन करताना एक समाजशास्त्राचा प्राध्यापक म्हणुन भारतीय समाज आणि जर्मनीतील समाज यांची नकळत तुलना होते.प्रवासवर्णनात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव अधिक जाणवतो. व्यक्तिनी मिळून समाज घडतो म्हणून जर्मनीत भेटलेल्या पाहिलेल्या व्यक्तिंच्या वर्तनातून तेथील समाज कसा असेल याची कल्पना लेखकाला येते त्यामुळे लेखक जर्मनीतील समाज भारतीय समाजापेक्षा वेगळावाटतो याचे एक महत्त्वाचे कारण ते आपल्या प्रवास वर्णनात अनेकवेळा लिहीतात की, जर्मनीतील लोक माणसाला माणूस म्हणून समानतेची वागणूक देतात. सार्वजनिक जीवनात धर्म, जात वर्ण यांचा तेथे कधी अडथळा येत नाही हे त्यांना प्रकर्षाने जाणवते.

डॉ. मच्छिंद्र सकटे यांना जर्मनीला जाण्यासाठी आर्थिक मदत केलेल्या असंख्य समाजबांधवांचे ऋण व्यक्त केले आहे. ‘ते म्हणतात संपूर्ण जग सर्वांसाठी खुले झाले आहे पण १९९४ पर्यंत तरी परदेशात जाणे थोडेसे कठीण होते. त्यातही माझ्यासारखा गावकुसाबाहेरचा मुलगा देशाबाहेर जाणे ही निदान त्यावेळी तरी अप्रुप वाटावे अशीच घटना होती.’[१] याला कारणही तत्कालिन परिस्थिती आहे सकटे आपली आर्थिक परिस्थिती सांगताना महाविद्यालयात नोकरीसाठी हजर होताना घडलेला प्रसंग सांगतात. कोल्हापूरात रयत शिक्षण संस्थेचे शाहू कॉलेज आहे त्या कॉलेजमध्ये हजर होण्यासाठी आपल्याकडे केवळ वीस रुपये असल्याचे ते नमुद करतात. विटा-कोल्हापूर हा गाडीखर्च सतरा रुपये झाला आणि राहिलेल्या तीन रुपयात वडा पाव खावा लागतो ही परिस्थिती जून १९९० ची होती. लेखक १९९४ रोजी जर्मनीला जाणार होते. प्राध्यापकांच्या त्या काळातील नोकरीचा विचार करता जर्मनीला जाणे शक्य नव्हते. ते शक्य होण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेतील सफाई कामगारांनी, मार्केट यार्डातील हमालांनी एक रुपया पासून मदत केली. समाजातील ज्ञात अज्ञात व्यक्तिंनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख लेखक आवर्जून करतात. तसाच उल्लेख ते जाती-जातीत असलेला श्रेष्ठ - कनिष्ठ भेदभाव कसा आहे ते सांगतात. दलित म्हणजे जाती व्यवस्थेने अन्याय झालेला परंतू दलितामध्ये ही एक जात दुसऱ्या जातीला कमी लेखण्यात धन्यता मानते आपणच श्रेष्ठ असल्याचा अभिमान बाळगल्यामुळेच दलित आजही विखुरलेला आहे हे शल्य ते अनेकदा व्यक्त करतात.

भारतीय व्यक्तिला परदेश प्रवासाचे आजही कौतुक वाटते. मच्छिंद्र सकटे हे जर्मनीला जाणार हा अभिमान सर्व जातीचा होता. आपला सहकारी परदेशात गेला पाहिजे ही प्रबळ इच्छा सर्वांचीच होती. म्हणून समाजातील अनेकांनी मदत केली. प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंतची स्थिती आणि प्रत्यक्षात जर्मनीला जाण्यासाठी मुंबईत येण्यापर्यंतचा अनुभव विमानतळ, तिथली व्यवस्था नातेवाईक, मित्रमंडळी प्रत्यक्ष निरोप देण्यासाठी आल्यानंतर निरोपाच्या वेळी झालेली मनाची अवस्था तितक्याच भावस्थितीत वर्णली आहे. मुंबई विमानतळावर असताना लेखकाच्या मनात अनेक विचार येतात आपली आर्थिक परिस्थिती नसताना केवळ समाजातील सर्वांच्या

मदतीमुळे हे घडून आले. ‘मी जर्मनीला जावे यासाठी अनेकांनी रात्रंदिवस कष्ट केले आपल्या समाजातील मुलगा परदेशात गेला पाहिजे ही तळमळ या सर्वांच्या कष्टामुळे लेखकाला दिसते. विमानतळावरील वातावरण आणि त्यापेक्षा पुढचा टप्पा म्हणजे लेखकाला ख-या अर्थाने आपण जर्मनीला जातो यावर विश्वास बसला तो दिल्ली विमानतळ सोडल्यावर त्यांच्या मनात देशाबाहेर पडेपर्यंत शंका होती म्हणून ते म्हणतात मला पासपोर्ट, व्हिसा मिळाला पण जोपर्यंत मी दिल्ली सोडत नाही तो पर्यंत मांग गुन्हेगार आहेत, मी मांग आहे म्हणून मी गुन्हेगार आहे. हे डोक्यात घुसलेले अजब तर्कशास्त्र काही केल्या जात नव्हते. म्हणून मी दिल्ली सोडली तेव्हा ख-या अर्थाने आझाद झालो, मुक्त झालो आणि आता मांग देशप्रेमी आहेत, गुन्हेगार नाहीत, मी गुन्हेगार नाही हे सिध्द करण्यासाठी मला धडपडावे लागणार होते. एवढेच नाही तर मांग ही देखील माणूस आहे. हेच तर मी जगाला सांगणार होतो.’[२]

लेखक स्वतः जातीच्या अनुभवाने, शिक्षणाने सजग झाला आहे. समाजशास्त्र विषयाच्या व्यापक अभ्यासाने जगभरातील मानवी समाजाचा अभ्यास लेखकाने केला आहे आणि आपण जगलेली जात आणि जातीचे अनुभव जगभरातील समाजशास्त्रज्ञांना पटवून सांगणार आहोत माणूस म्हणून जगण्याची धडपड, माणूस म्हणून सन्मान मिळावा ही अपेक्षा या जागतिक परिषदेच्या निमित्ताने जगासमोर मांडणार असल्याचा आत्मविश्वास लेखकाकडे आहे याचे भान त्याच्या लेखातून दिसून येते.

### देशाबाहेर प्रवासवर्णनातील जर्मन माणूस

डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी लिहिलेल्या देशाबाहेर या प्रवासवर्णनात त्यांना प्रत्यक्ष भेटलेल्या जर्मन माणसांचे स्वभाव दर्शन रेखाटले आहे. भारतातून निघाल्यानंतर जर्मनीच्या फ्रॅकफर्ट विमानतळावर त्यांचे आगमन होते. तिथली भव्यता डोळे दिपवून टाकणारी होती. जर्मनीच्या पोलीसांविषयी त्यांच्या सहकार्याची आणि त्यातही त्यांच्या नम्रतेने मदत करण्याच्या स्वभावाने लेखक प्रभावीत होतात. आणि त्यावेळी भारतातील पोलीस त्यांना आठवतो. रेल्वेतिकीट देणारी जर्मन स्त्री तीचे हसतमुख वर्तन आणि त्यांना भेटलेली पहिली जर्मन व्यक्ती आठवणीत राहते. एक्सक्यूजमी म्हणत स्वतःहून पुढे येऊन माझी ओळख करुन घेणारी रेल्वे प्रवासात मदत करणारी आणि भारताविषयी आणि भारतीय माणसांविषयी आदराने बोलणारी व्यक्ती प्रभावीत करुन गेली. त्या जर्मन व्यक्तीचे नाव होते जोसेफ सॅलेटीन तो पंचावन्न वर्षाचा होता. त्यांनी केलेली मदत व त्यांचे लेखकाशी असलेले वर्तन प्रभावीत करते.

लेखकाने जर्मनीतील बिलेफिल्ड येथे भेटलेल्या जर्मन स्त्री-पुरुष म्हणजेच व्यवसायाने शिक्षक असलेल्या जोडप्याने आपल्या सारख्या अनोळखी माणसाला केलेल्या मदतीने भारावून गेले. आपली बॅग उचलण्यापासून आपल्या राहण्याची, खाण्यापिण्याची सोय करुन पुन्हा बिलेफिल्ड विद्यापिठात नांव नोंदणी करुन तिथली

व्यवस्था झाल्यानंतरच ते अनोळखी कुटुंब लेखकाचा निरोप घेते. जर्मन माणसाच्या स्वभावाचे दर्शन ह्या प्रसंगातून लेखकाने बारकाईन मांडले आणि त्याच कुटुंबाविषयी प्रथमदर्शनी भारतीय माणूस म्हणून आपण कसा विचार करत होतो याविषयी त्यांना आपमानित झाल्यासारखे वाटते. लेखक म्हणतात "रोजने 'बाय' म्हणून हात वरती केला.येतो म्हणून मी निघालो. गाडीतून येताना एकच विचार मनात आला ही रोज गुलाबासारखी टवटवीत, सुंदर, पण मी काल रेल्वेत तिच्याविषयी किती वाईट विचार करीत होतो, माझी मलाच लाज वाटली. परक्या स्त्री विषयी संशय घेणा-या भारतीय मनोवृत्तीचा मला राग आला."[3] जर्मन माणूस हा देशाभिमानी, उद्यमशील, निसर्गभक्त, उपकारी, नम्र, रसिक, साहित्यभक्त आहे. योहान गटे व इतर साहित्यिकांविषयी आदर आणि अभिमान आणि आतिथ्यशील असा जर्मन माणूस लेखकाला अनुभवता आला.

## 'देशाबाहेर' प्रवासवर्णनाची भाषाशैली

लेखक डॉ. मच्छिंद्र सकटे हे समाजशास्त्राचे प्राध्यापक आहेत. भारतीय समाजस्तर विचारात घेता लेखक ज्या सामाजिक आणि जातीव्यवस्थेचा अनुभव घेतलेला आहे त्या व्यवस्थेतून बाहेर पडून शिक्षण घेऊन प्राध्यापक होऊन गावापासून तालुक्याच्या ठिकाणी जाणे आर्थिकदृष्ट्या आव्हान असतानाच्या काळात देशाबाहेर जाणे लेखकाला महत्त्वाचे वाटते म्हणून त्यांनी आपल्या भाषेत त्याचे वर्णन केले आहे. जागतिक परिषदेला जाण्यासाठी आणि जर्मनीत व्यवहार दळणवळण करण्यासाठी त्यांनी इंग्रजीचा वापर केला असला तरी या प्रवासवर्णनात ते संभाषण प्रमाण मराठी भाषेत लिहीले आहे. क्वचितचइंग्रजी भाषेचा वापर केला आहे. या भाषेच्या वापराने प्रवासवर्णनाची वाचनियता सहज होते वाचकांना अडथळा ठरत नाही.भारतीय प्राध्यापक डॉ. घनश्याम व डॉ.बळीराम यांच्याशी संभाषण हिंदीतून आले आहे.लेखकाने 'देशाबाहेर' या प्रवास वर्णनात आपल्या आयुष्यातील काही घटना प्रसंगाचा आढावा त्या त्या अनुषंगाने घेतला असून यामधुन लेखकाचे भावविश्व उलगडते. जर्मनीतील विद्यापीठात जाण्यापासून ते परत येईपर्यंत आलेले अनुभव लेखकाच्या नजरेतून दिसलेली जर्मनी आणि जर्मनीतील माणसे आणि त्यांच्या स्वभाव लेखकाने आपल्या सहज ओघवत्या शैली व्यक्त केल्या आहेत.

## मराठी प्रवास वर्णनात 'देशाबाहेर' प्रवासवर्णनाचे वेगळेपण

प्रवास ही मानवी जीवनाची मुलभूत प्रेरणा आहे. त्या त्या काळात उपलब्ध साधन सामुग्रीच्या आधाराने माणूस प्रवास करीत आला आहे. आपण केलेला प्रवास कथन करावा किंवा कुणाला तरी सांगावा या प्रेरणेने प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार अस्तित्त्वात आला. भारतीयांनी वेगवेगळ्या तिर्थयात्रा केल्या. त्या विषयीची प्रवासवर्णने उपलब्ध आहेत. इंग्रजांच्या आगमनानंतर प्रवास वर्णन हा साहित्य प्रकार अधिक व्यापक झाला

परदेश प्रवासा विषयीचे लेखन विपूल प्रमाणात आढळतात. इंग्रजांच्या राजवटीपासून स्वातंत्र्यापर्यंतच्या अनेक प्रवास वर्णनात परदेश प्रवास वर्णन आढळतात. यामध्ये अनंत काणेकरांचे धुक्यातून लाल ता-याकडे (१९४०) याही पेक्षा पु. ल. देशपांडे यांच्या 'अपुर्वाई' आणि डॉ. मच्छिंद्र सकटे यांच्या देशाबाहेर या प्रवासवर्णनाचा तुलनात्मक अभ्यास केल्यास वेगळे संदर्भ मिळतात.

पु. ल. देशपांडे 'अपुर्वाई'तील प्रवास हा प्रामुख्याने मध्यमवर्गीय मराठी माणसाचा प्रातिनिधीक प्रवास आहे. हा प्रवास भारत सरकारच्या वतीने प्राप्त झाला आहे. इंग्लंड, पॅरिस, जर्मनी, स्कॉटलंड इत्यादी युरोपातील देश आणि तेथील नवलविशेष, प्रवासातील विनोद उपहास कोट्या यांच्या उपयोग केला आहे. 'अपुर्वाई' आणि 'देशाबाहेर' या दोन प्रवास वर्णनाची तुलना होऊ शकत नाही. अपुर्वाईत प्रवास वर्णनाच्या प्रेरणा वेगळ्या आहेत तर 'देशाबाहेर' या प्रवास वर्णनाच्या प्रेरणा भिन्न आहेत. 'देशाबाहेर' मध्ये गरीब समाज बांधवांनी स्वकष्टानी एक एक रूपया वर्गणी दिली तर अपुर्वाई या प्रवासवर्णनात भारत सरकारने मदत केलेली आहे. व्यवसायनिमित्त आणि आर्थिक संपन्नता असताना केलेला भारताबाहेरचा प्रवास आणि डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी केलेला प्रवास त्यांच्या प्रेरणा भिन्न आहेत. मराठीतील अशी अनेक प्रवासवर्णने वाचकाला एका विलोभनीय जगाचे दर्शन घडविताना सुखावतात.तर डॉ. मच्छिंद्र सकटे यांच्या 'देशाबाहेर' या प्रवासवर्णनात जाती व्यवस्था, आर्थिक विवंचना अशा आधाराने हे प्रवासवर्णन सतत लोकांनी दिलेल्या आधाराची जाणीव करून देते. म्हणून इतर मराठी प्रवास वर्णनापेक्षा 'देशाबाहेर' हे प्रवासवर्णन अनेक अंगांनी वेगळे ठरते.

**निष्कर्ष :**

- 'देशाबाहेर' या प्रवास वर्णनाचे लेखन प्रवास केल्यानंतर दहा वर्षाच्या कालावधीनंतर केले आहे.
- प्रवासवर्णनकार व्यवसायाने समाजशास्त्र विषयाचा प्राध्यापक आहे त्यामुळे त्याच्या अभ्यास क्षेत्राचा प्रभावया प्रवास वर्णनावर झालेला आहे.
- प्रवासवर्णनात व्यक्तिगत आयुष्यातील आठवणी कुटुंब आणि समाज याविषयी लेखन झाले आहे.
- जर्मनीतील परिषदेला जाण्यासाठी आर्थिक पाठबळ ज्यांनी दिले त्या सर्वांविषयी आठवणी व्यक्त केल्या आहेत.
- प्रवासवर्णनात लेखकाने आपल्या तंबाखू आणि गुटखा खाण्याच्या सवयीचा उल्लेख केला असून मद्यसेवन करणा-या इतरांचे वर्णन केले आहे. लेखक कोणत्याही प्रकारचे मद्य सेवन करीत नाही हे त्यांनी प्रांजळपणे नमुद केले आहे.

- 'देशाबाहेर' या प्रवासवर्णनात जर्मन आणि भारतातील परिस्थिती यांचे तुलनात्मक लेखन अनेक घटना प्रसंगातून केले आहे.
- मराठी भाषेतील काही नावाजलेल्या लेखकांनी परदेश प्रवासासंबंधी प्रवास वर्णने लिहीली आहेत. त्यामध्ये वाङमयीन गुणांचा अधिक भरणा आहे.
- 'देशाबाहेर' या प्रवासवर्णनात जरी वाङमयीन गुणांचा भरणा नसला तरी सामाजिक भान आणि वास्तव दर्शन हा उद्देश लेखकाचा दिसतो.
- लेखकाचा प्रवासवर्णनाचा हेतू 'देशाबाहेर' आलेले अनुभव कथन करणे हा आहे.
- लेखकाचा सामाजिक स्तर आणि तत्कालिन आर्थिक स्थिती यांचा प्रभाव संपूर्ण प्रवासवर्णनात स्पष्ट दिसतो.
- गावकूसाबाहेर आलेले अनुभव आणि देशाबाहेर आलेले अनुभव लेखकाला व्यक्त करू वाटतात या आंतरिक प्रेरणेने 'देशाबाहेर' या प्रवासवर्णनाचे लेखन झाले आहे.

**संदर्भ:**

१) सकटे मच्छिंद्र देशाबाहेर निर्मिती संवाद प्रॉ.प्रा. लि. कोल्हापूर प्रथमावृत्ती ३१ ऑगस्ट २०१४ पृ. १०

२) तत्रैव पृ – ५४

३) तत्रैव पृ – ७९

४) सावंत वसंत प्रवासवर्णन एक वाडमय प्रकार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई – ४०००३२ प्रथमावृत्ती जानेवारी १९८७